दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार २९ मे २०२४ | अंक१७० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

# विधानसभा निवडणूक लढण्याचे मनोज जरांगे यांचे स्पष्ट संकेत; म्हणाले, आरक्षण द्या नाहीतर?

## मराठा समाजाला आरक्षण द्या. नाहीतर विधानसभेच्या २८८ जागा लढवणार आहे



देशात लोकसभा निवडणूक होत आहे. लोकसभे पाठोपाठ महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी महत्वाचं भाष्य केलं आहे. आम्हाला आमचं हक्काचं आरक्षण पाहिजे. आम्हाला विधानसभाकडे जायला लावू नका.... मराठा समाजाला आरक्षण द्या. नाहीतर विधानसभेच्या 288 जागा घेऊन मनोज सर्व जाती समाजाला लढवणार आहे, असं जरांगे पाटील म्हणाले आहेत. टीव्ही 9 मराठीशी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी महत्वाचं विधान केलं आहे. तसंच आपण उपोषण करणार असल्याचंही मनोज जरांगे यांनी सांगितलं आहे. उपोषणावर मनोज जरांगे काय म्हणाले? मी कठोर उपोषण करणार आहे. आमच्या कार्यकर्त्यांना फूस लावण्याचा प्रयत्न करू नका. 4 जून ला उपोषण करणार आहे. मुंडेवाडीमधील विषय शांत झाला आहे. त्यांच्या नेत्याने काय केले माहीत नाही. पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे समाजला शांत रहा सांगत नाहीत. माझ्या समाजला मात्र त्या ठिकाणी त्रास झाला नाही पाहिजे. आरक्षण मागणी पूर्ण झाली नाही. तर समाज विधानसभेच्या सर्व जागा लढवणार आहे. लोकसभेला काय झालं हे त्यांना माहीत आहे, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. सगेसोयऱ्याची अंमलबजावणी करू म्हणत- म्हणत पाच महिने झाले आहेत. त्याची अंमलबजावणी होणं गरजेचं आहे. मी कधीही सरकारच्या विरोधात नव्हतो. सरकारने आरक्षण न दिल्याने बाकीचे प्रयोग झाले आहेत. 6 जून च्या आत सग्या सोयऱ्याची अंमलबजावणी करा. मराठा आणि कुणबी एकच आहेत. आम्हाला राजकारणात पडायचं नाही. आम्ही समजाला आरक्षण दिल्याशिवाय थंड बसणार नाहीत. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांना समजून सांगतो. राजकारण माझा विषय नाही. समाजाचा तुमच्यावर विश्वास ढळू देऊ नका. 4 जूनला मी आमरण उपोषणवर ठाम आहे आणि मी ते करणारच आहे, असं मनोज जरांगे बोलताना म्हणाले.

### छगन भुजबळांवर गंभीर आरोप

मराठे काही देवेंद्र फडणवीस यांचे शत्रू नाहीत. छगन भुजबळ यांनी शिवसेना पांगवली. राष्ट्रवादी पांगवली आणि आता मराठे आणि ओबीसी ही त्यांनीच पांगवले. आमच्यापेक्षा जास्त ओबीसी समाज भाजपापासून सर्वात जास्त छगन भुजबळ यांनी पांगवली. हे मी जबाबदारीने सांगतोय. छगन भुजबळ हे भाजपच्या ताटात खातात आणि भाजपाचीच टिंगल उडवतात. ओबीसी समाज फडणवीस यांच्या विरोधात घालण्याचे काम भुजबळ यांनी केलं आणि नाव आमचं सांगतात. राज्यात 4 जून ला शांतता राहील याची काळजी घ्या, असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## लिंबागणेशचे माजी उपसरपंच अशोक जाधव यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन

**बीड प्रतिनिधी**



लिंबागणेश:- बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील माजी सरपंच अशोक सुंदरराव जाधव ( वय ४४ वर्षे) यांचे आज दि.२८ मंगळवार रोजी सकाळी साडे दहा वाजता बीड जिल्हा शासकीय रुग्णालयात निधन झाले. सन २०१२ ते २०१७ दरम्यान लिंबागणेश गावचे उपसरपंच असलेले अशोक जाधव गेल्या २ वर्षांपासून आजारी होते. गुरुवार रोजी अत्यवस्थ वाटु लागल्याने त्यांना बीड जिल्हा रुग्णालयात अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले होते. आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. सायंकाळी ४ वाजता त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी मोठ्या प्रमाणात पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.त्यांच्या पश्चात पत्नी बेबी,मुलगा शुभम,मुलगी सानिया,भाऊ महावीर,आई शिलावती,वडिल सुंदरराव जाधव असा परीवार आहे.

## कु. शिवानी बिरूबा फाटक हिचे दहावी बोर्ड परिक्षेत उत्तुंग यश

**बीड प्रतिनिधी**



डॉ पारनेरकर महाराज विद्यालय मांजरसुंबा येथील कु. शिवानी बिरूबा फाटक हिने राज्य माध्यमिक शालांत परिक्षेत 93.80 टक्के गुण घेवून प्रथमश्रेणीत येण्याचा बहुमान मिळविला आहे. तिच्या या उत्तुंग यशाबद्दल तिचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. कु. शिवानी बिरूबा फाटक हिने इयत्ता दहावी बोर्ड परिक्षेमध्ये 93.20% गुण घेऊन उत्तुंग यश संपादित केले आहे. कु. शिवानी बिरूबा फाटक ही शिवसंग्राम चे युवा नेते पंचायत समिती सभापती ज्ञानेश्वर कोकाटे यांची भाची आहे.कु. शिवानी बिरूबा फाटक हिने अथक परिश्रम सातत्यपूर्ण अभ्यास करून घरीच अभ्यास करून हे यश संपादन केले आहे.कु. शिवानी बिरूबा फाटक ही खूप गुणवान असून लहानपणापासून विविध स्पर्धा परिक्षेतही तिने यश संपादन केले आहे. कु. शिवानी बिरूबा फाटक हिने सर्वच विषयांमध्ये चांगल्या प्रकारचे गुण घेतले आहेत. अनंत अडचणीवर मात करत तिने चिकाटीने अभ्यास करून हे यश मिळवले आहे.शिवाय कसल्याही प्रकारची चीटिंग न करता स्वतःच्या हिंमतीने दहावी बोर्डाचे पेपर सोडून 93.20% मिळवत यश मिळवले आहे. तिच्या या यशाबद्दल डॉ पारनेरकर महाराज विद्यालय मांजरसुंबा या शाळेतून प्रथम आल्याबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

## तुलसी इंग्लिश स्कुलची १००% टक्के निकालाची परंपरा कायम
## गुणवंत विद्यार्थ्यांचे डॉ.प्रियंका रोडे, प्राचार्या उमा जगतकर यांनी केले अभिनंदन




बीड, (प्रतिनिधी): येथील देवगिरी प्रतिष्ठान बीड संचलित तुलसी इंग्लिश स्कूलचा दहावीचा निकाल १००% लागला असून गुणवंत विद्यार्थ्यांचे डॉ.प्रियंका रोडे, प्राचार्या उमा जगतकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे. तुलसी इंग्लिश स्कूल बीड येथे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये दहावी परीक्षेमध्ये क्षितिज धनवे ९४.००% घेऊन प्रथम आला आहे. द्वितीय क्रमांक आर्या चव्हाण ९३.८०% तर आर्यन कारडे ९२.००% घेऊन तृतीय आला आहे. हर्मिका जगतकर ९१.८०%, दीक्षा सरपते ९१.८०%, सार्थक पोकळे ९१.८०%, शेख झोया ९१.४०%, निशा मस्के ८९.६०%, कृष्णा दबडे, ८९.४०%, जिया लोखंडे ८८.६०% घेऊन चांगल्या मार्कने उत्तीर्ण झाले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे, प्राचार्या उमा जगतकर, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## सामान्य कुटुंबातील समृद्धी बाळासाहेब माने व प्रांजल ज्ञानेश्वर बजगुडे यांचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश ..!



( बीड प्रतिनिधी ) बीड तालुक्यातील मौजे बेलखंडी येथील सामान्य कुटुंबातील समृद्धी बाळासाहेब माने हिने अथक परिश्रम घेत 92.80 गुण तर प्रांजल ज्ञानेश्वर बजगुडे हिने 91.40 घेऊन घवघवीत यश संपादन केले आहेत. या यशाबद्दल शिक्षक वृंद व ग्रामस्थकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



## पवनराजे इंग्लिश स्कूल केज च्या विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी ; यशाची परंमपरा कायम कै. राम चौरे प्रा.मा.व उच्च माध्यमिक विद्यालय व पवनराजे इंग्लिश स्कूल केजचा शंभर टक्के निकाल

**केज प्रतिनिधी**

- शैक्षणिक वर्ष २०२३/२४ एस एस सी बोर्डाकडून घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत पवनराजे इंग्लिश स्कूल केज व कै.राम चौरे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रतीवर्षा प्रमाणे याही वर्षी घवघवीत यश संपादन करून यशाची परंपरा कायम ठेवली. विद्यार्थ्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खंडराव चौरे तथा सचिव प्रणिता चौरे व मुख्याध्यापक अशोक मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली पवनराजे इंग्लिश स्कूल तथा कै राम चौरे प्राथमिक माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी एसएससी परीक्षेत उत्तुंग भरारी घेतली आहे. दोन्ही शाळेचा एकूण निकाल १००% टक्के लागला असुन पवनराजे इंग्लिश स्कूल मधुन सर्वप्रथम येण्याचा मान कुमारी साक्षी राम चौरे ९०.०० ?, तर द्वितीय कुमारी मैथली पांडुरंग चौरे ८९.४० %,तर सर्व तृतीय कुमारी विदिशा राहुल गायकवाड ८८.६०% व कुमारी ज्योती बालासाहेब चौरे ८८.६० % गुण मिळवले आहेत तर कै. राम चौरे प्राथ माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थीनी कुमारी किरण राजाभाऊ केदार हिने प्रथम तर व्दितीय कुमारी आकांशा गौतम जोगदंड ८९.८०% तसेच तृतीय कुमारी सोनाली आसाराम चौरे ८९.२० गुण घेऊन नंबर मिळवला असुन सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन पवनराजे इंग्लिश स्कूलचे तथा कै राम चौरे प्राथ.माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष खंडेराव चौरे सचिव सौ.प्रणिता खंडेराव चौरे तसेच मुख्याध्यापक अशोक मस्के सर याच्या सह शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

कविता

## तरंग

रुसवा एक बहाणा
बहाण्यात प्रेमाचा ओलावा
ओलावे मनी पाझरले
नयनी पाणी तरळले
त्या तरळत्या पाण्यात
मज , माझेपण दिसले
भाव भावनांच्या नात्यात
आनंदी तरंग उठले

तिचा तो हट्ट विचित्र
घ्या ना मजला मिठीत
त्या मिठीत भान हरपले
आपसूक तिने डोळे मिटले
त्या मिटल्या स्वप्नी डोळ्यात
मज , माझेपण दिसले
भाव भावनांच्या नात्यात
आनंदी तरंग उठले

सरला आता मध्यान्ह
क्षितीजाचे उरले सानिध्य
सुरकुतलेल्या चेहऱ्या वरती
डोळ्यात भाव लुकलुकले
त्या लुकलुकत्या भावात
मज , माझेपण दिसले
भाव भावनांच्या नात्यात
आनंदी तरंग उठले

ना वल्हे ना शिड
नावेत त्या बसणे
एकमेकांच्या आधारे
लाटांशी खेळत असणे
त्या लाटांच्या बागडण्यात
मज , माझेपण दिसले
भाव भावनांच्या नात्यात
आनंदी तरंग उठले

हेमंत रत्नपारखी
मंगळवेढा

# ग्रामीण भागात पाणी टंचाईच्या तिव्र झळा; जिल्हा प्रशासन वातानुकूलित कार्यालयात पाणीटंचाई आढावा बैठका घेऊन निर्धास्त :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- बीड जिल्ह्यात मागच्या पावसाळ्यात समाधान कारक पाऊस झाला नसल्याने ग्रामीण भागातील लोकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.एप्रिल व मे महिन्यात पडलेल्या तिव्र उन्हामुळे जिल्ह्यातील जवळपास सर्वच धरणांनी तळ गाठला आहे.१४३ धरणांमध्ये केवळ ४ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे. जिल्ह्यातील लघु ,मध्यम प्रकल्प कोरडे पडल्याने जमिनीतील पाणी पातळी घटल्याने विहिरी, बोअरवेल कोरड्याठाक पडल्याने पाणी पातळी खालावल्याने अनेक गाव वाड्या तांड्यावर तिव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. उन्हाळा सुरू झाल्यानंतर ग्रामीण भागात दरवर्षी पाणीटंचाई सुरू होते.ग्रामीण भागातील महिलांना पहाटेपासूनच पाण्याच्या शोधार्थ पायपीट करावी लागते. त्यात महिला आणि लहान बालके यांच्या डोक्यावर हंडे, घागरी,सायकलला अडकवलेली कॅंड, घागरी व इतर माध्यमातून पाणी मिळवण्यासाठी त्यांची धावपळ दिसुन येते. अलीकडे पुरुष मंडळी घरातील महिलांसोबत पाणी भरण्याच्या मदतीसाठी येत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.जिल्हा प्रशासनाचे प्रयत्न मात्र तोकडे पडताना दिसत असुन जिल्हा प्रशासन पाणीटंचाईचा आराखडा वातानुकूलित रुम मध्ये बसुन प्रसारमाध्यमांतुन पाणीटंचाई वर मात करण्यासाठी आवाहन करत निर्धास्त असल्याचे दिसून येत आहे. सविस्तर माहितीस्तव बीड तालुक्यातील पोखरी (घाट) येथील २०० लोकसंख्या असलेली भोसले नामक दलित वस्ती.सार्वजनिक विहीरीत भायाळा साठवण तलावातुन आठवड्याला पाणी सोडले जाते.७ परस विहीरीतील पाणी शेंदुन सांडपाण्यासाठी वापरावं लागते. पिण्याच्या पाण्याची अवस्था बिकट आहे. संपूर्ण वस्तीला सध्या एकाच हातपंपाचा आधार असुन अधुन मधुन १०-२० हंडे पाणी येते त्यामुळे लहानमुले आपला नंबर येण्याची वाट बघत असतात.संपुर्ण वस्तीला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत नसल्याने बोअरवेल द्यावा अशी ग्रामस्थांची मागणी आहे. संबधित प्रकरणी सरपंच मुळीक यांच्याशी संपर्क साधला असता पंचायत समितीकडे बोअरवेल आणि टॅंकरचा प्रस्ताव मार्चमध्येच पाठवला असुन अजुन प्रशासनाकडून सकारात्मक निर्णय येण्याची वाट पहात असल्याचे सरपंच बिभीषण मुळीक यांनी सांगितले. जिल्हा प्रशासनाकडून पाणीटंचाई आढावा बैठकीत मदतीचे आवाहन; वास्तवात आश्वासनावर बोळवण बीड जिल्हा प्रशासनाने वातानुकूलित कार्यालयात पाणीटंचाई आराखडा आखताना पाणीटंचाईच्या अनुषंगाने टॅंकर मंजुरीबाबत काही अडचणी असल्यास संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांना तसेच पाणीटंचाई विषयी काही तक्रार असेल तर जिल्हा परीषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याशी संपर्क साधला असे आवाहन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ यांनी केलेले आहे. मात्र संबंधित प्रकरणात आधिकाऱ्यांशी संवाद साधल्यानंतर फक्त आश्वासनच पदरी पडताना दिसत आहे.केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन मिशन अंतर्गत प्रति व्यक्ती ५५ लिटर पाणी देण्याची घोषणा हवेतच विरल्याचे दिसून येत आहे. अशुद्ध पाण्यामुळे जलजन्य आजाराबरोबरच पाणीवाहण्याने महिलांना शारीरिक आजार :- डॉ.गणेश ढवळे ग्रामीण भागातील बहुतांश जलशुद्धीकरण केंद्रे धुळखात पडुन असुन अशुद्ध पाण्यामुळे अतिसार ,काविळ,विषमज्वर आदि जलजन्य आजार पसरत असतानाच विहिरीतल्या आणि बोअरच्या पाण्यात जास्त प्रमाणात क्षार आढळतात. खरडुन पाणी उपसा करत असल्याने जंतुसंसर्गाचा धोका अधिक असतो.ग्रामिण भागातील बहुसंख्य महिलांच्या शरीरात रक्त कमी असल्याने ॲनिमिया आजाराची थकवा येणे, चालताना दम लागणे आदी तक्रारी असतात. मुळातच शरीरात कॅल्शियमचे प्रमाण कमी असल्याने विहिरीतुन पाणी शेंदल्याने तसेच डोक्यावरुन पाणी वाहुन आणण्यामुळे मणक्यांच्या आजारांचे आढळून येतात.

# खरात आडगावात घाणीचे साम्राज्य, गावक-यांच्या आरोग्याकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष.





प्रतिनिधी. माजलगाव माजलगाव तालुक्यातील खरात आडगावात घाणीचे साम्राज्य, गावकऱ्यांच्या आरोग्याकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष झाल्याने खरात आडगाव येथील गावातील संपूर्ण रस्त्यांवर घाणीचे साम्राज्य पसरले असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याकडे ग्रामपंचायत प्रशासन मात्र पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचे नागरिकांतून बोलले जाते या गावामध्ये मूलभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव आहे. ह्या सुविधा पुरवण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरत आहे. गावांमध्ये बहुतांश रस्त्यांचे बांधकाम झालेले नसल्याने गटारं देखील बांधण्यात आलेली नाहीत. त्यामुळे गावातील संपूर्ण सांडपाणी व पावसाचे पाणी रस्त्यावर संपूर्ण सांडपाणी रस्त्यावर तुंबल्याने सर्वदूर गटारे साचली आहेत, असा आरोपही गावकऱ्यांनी केला आहे. या साचलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होत आहे. सोबतच दुर्गंधीमुळे देखील नागरिक बेजार झाले आहेत. त्यामध्ये जिल्ह्यामध्ये डेंग्यू आणि मलेरियाचा प्रादुर्भाव होत असल्याने या घाणीचे साम्राज्या परसल्याने गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यासंदर्भात नागरिकांनी वेळोवेळी तोंडी तक्रारी केल्या, मात्र ग्रामपंचायतीने दुर्लक्ष केले असे गावकऱ्यांनी सांगितले आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन स्थानिक ग्रामपंचायत सचिव आणि इतर यंत्रणेवर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे

# सप्तखंदेरी वादक सत्यपाल महाराज यांच्या कार्यक्रमाला उपस्थित रहा. भाई लहू सोळुंके




**बीड प्रतिनिधी**

माजलगांव :- प्रतिनिधी बीड जिल्हा भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त सप्तखंजिरी वादक व समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचा समाजप्रबोधनाचा कार्यक्रम श्रीक्षेत्र शिदोड ता. जि. बीड येथे हनुमान मंदिर मैदानावर महालक्ष्मी नगर आयोजित करण्यात आला असून आपण त्या कार्यक्रमाला उपस्थित राहून समाज प्रबोधका किर्तनकार सत्यपाल महाराज यांचे पुरोगामी व विद्रोही विचार ऐकावे असे अवाहन भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे माजलगांव तालुका चिटणीस भाई लहू रमेशराव सोळुंके यांनी केले आहे

# १०वी परीक्षेत अनम सौदागर ही १०० टक्के मार्क घेऊन उत्तीर्ण

**बीड प्रतिनिधी**

माजलगाव येथील सिद्धेश्वर विद्यालयात शिक्षण घेणारी अनम आ. बाखी सौदागर ही शंभर टक्के मार्क घेऊन उत्तीर्ण झाली असून तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे या विषयाची माहिती डॉक्टर मुजिब सौदागर यांची पुतणी बाखी सौदागर यांची मुलगी अनम हिस मराठी विषयात 95 संस्कृत विषयात शंभर गणित विषयात 97 सायन्स व टेक्नॉलॉजी विषयात 96 मार्क मिळाले असून एकूण गुण 485+15 असे पाचशे मार्क मिळाले आहे त्याच्यामुळे तीचे सर्वत्र अभिनंदन



होत असून राष्ट्रवादी काँग्रेसचे कचरू तात्या खळगे पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, सुधीर नागपुरे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले, पत्रकार महेंद्र मस्के, ज्योतीराम पांढरपोटे, अरविंद ओव्हाळ, विष्णू उगले, जाकेर पटेल, शहाजी टमके, चांद बनातवाला, राम किसन, प्रदीप कर्डिले यांनी अभिनंदन केले आहे

# देव आणि संतांच्या संगतीमधूनच जीवनाचा उद्धार होतो : जनार्दन महाराज सांगता , आर्वी येथील वार्षीक हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

## हजारो भाविकांना महाप्रसादाचे केले वाटप

**प्रतिनिधि/बीड**

देव आणि संत यांच्या संगतीतूनच जीवनाचा उद्धार होतो. नाम संकिर्तनात मोठे सामर्थ्य आहे. त्यामुळे विषय भोगापेक्षा अध्यात्मात अधिक सुख असल्याचे प्रतिपादन मत्स्येंद्रनाथ संस्थानचे महंत स्वामी जनार्दन महाराज यांनी केले. शिरुर तालुक्यातील आर्वी येथे सुरु असलेल्या वार्षिक हरिनाम सप्ताहाची मंगळवारी महंत जनार्दन महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता झाली यावेळी ते बोलत होते. किर्तनासाठी हजारो गावकरी उपस्थित होते. शिरुर तालुक्यातील आर्वी येथे गतवर्षीपासून मत्स्येंद्रनाथ संस्थानचे महंत स्वामी जनार्दन महाराज यांच्या नेतृत्वात वार्षिक हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते.यंदाही २१ ते २८ मे दरम्यान हा सप्ताह पार पडला. यामध्ये ब्रह्मनाथ संस्थानचे मठाधिपती रामेश्वर महाराज शास्त्री यांच्या भागवत कथेचे आयोजन केले गेले होते. या भागवत कथेला मोठा प्रतिसाद मिळाला. सप्ताहात उद्धव महाराज शास्त्री, योगिराज महाराज, हनुमान महाराज शास्त्री, शितलताई साबळे, सतिश महाराज, शिवाजी महाराज देशमुख, रोहणीताई परांजपे यांची किर्तने झाली. तर, २८ मे रोजी स्वामी जनार्दन महाराज यांचे काल्याचे किर्तन झाले. संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर जनार्दन महाराज यांनी निरुपण केले.



जनार्दन महाराज म्हणाले, आयुष्यात संगतीला मोठे महत्व असून देव आणि संतांची संगती ही जीवनाचा उद्धार करणारी असते. तर दूर्जनाची संगती ही विनाश करणारी असते. देवाच्या नामस्मरणातूनच सात्विक भाव तयार होतो. त्यातून चांगली संगत घडत असते. त्यामुळे गाव पातळीवर हरिनाम सप्ताहा सारख्या कार्यक्रमांची आवश्यकता असते. असे सांगून त्यांनी भगवान श्रीकृष्णाने कशा प्रकारे गोकुळात लिला केल्या आणि त्याचा भाव काय होता याचे निरुपण केले. किर्तनाला हजारो भाविकांची उपस्थिती होती. तत्पूर्वी गावातून महंत जनार्दन महाराज यांची मिरवणूक काढली गेली. किर्तनात नशीकेत जरे, संजय देवकर, सुदाम देवकर, अनिल जरांगे, दिनकर खामकर यांनी गायनाची साथ केली. तर, लहु देवकर, दत्ता सटले, अंकुश कातखडे यांनी मृदंगाची साथ केली. किर्तनानंतर हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले गेले.

\- - - - - - - - - - -

गडासाठी दिली ५१ हजारांची देणगी

यावेळी, गावकऱ्यांच्या वतीने महंत जनार्दन महाराज यांचा सत्कार केला गेला. गावातील महिला मंडळाकडून रामेश्वर शास्त्री यांना सुवर्ण अंगठी भेट दिली गेली. तर, महंत जनार्दन महाराज यांना मठ बांधकामासाठी गोवर्धन वाघ यांनी ५१ हजारांची देणगी दिली.

\- - - - - - - - - -

मनोज जरांगे यांच्या शुभेच्छा

या सप्ताहाच्या सांगता प्रसंगी मराठा आरक्षणासाठी लढा उभारणारे मनोज जरांगे पाटील हे उपस्थित राहणार होते. मात्र ४ जून पासून ते पुन्हा उपोषण करत असल्याने त्यांनी सध्या दौरे स्थगित केले आहेत. मात्र त्यांनी फोनवरुन संवाद साधून गावकऱ्यांना हरिनाम सप्ताहाबाबत शुभेच्छा दिल्या व उपोषणानंतर गावाला भेट देण्याचे आश्वासन दिले.

# कु.मिसबाह पटेलचे दहावी परीक्षेत ८९ टक्के घेत घवघवीत यश

**गंगापुर प्रतिनीधी**

गंगापूर तालुक्यातील नावाजलेली अशी राजाबाई माधव लालजी धूत शाळेची विद्यार्थिनी कु.मिसबाह अमिन पटेल या विद्यार्थिनीने दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. नुकत्याच मार्च- एप्रिल २०२३/२४ दरम्यान दहावीच्या बोर्ड परीक्षा घेण्यात आल्या. यामध्ये राजाबाई माधव लालजी धूत शाळेचा विद्यार्थिनींनी परीक्षा दिली होती. यापैकी पत्रकार अमिन पटेल यांची मुलगी कु.मिसबाह अमिन पटेल या विद्यार्थीनींनी ८९ % टक्के गुण घेत घवघवीत यश संपादन केले



आहे.या विशेष कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार राजकुमार धूत,अक्षय धूत,शालेय समिती अध्यक्ष सुशील कुमार मंत्री, सुकुमार मंत्री,राजेंद्र सरोवर,संतोष भालेराव,प्रवीणकुमार सोमाणी,शालेय समिती सदस्या श्रीमती तृप्ती मंत्री, मुख्यध्यापिका श्रीमती बेंद्रे संजीवनी,पर्यवेक्षिका श्रीमती विदुला शास्त्री,न्यू हायस्कूलचे शिक्षक अंबादास उंद्रे नातेवाईक मित्र परिवाराने अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बाळनाथ विद्यालय चाकरवाडी या शाळेचा १००% निकालाची परंपरा कायम..

**बीड प्रतिनिधी**

\- बीड तालुक्यातील श्री क्षेत्र चाकरवाडी येथे श्री उत्तरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ हनुमंत पिंपरी संचलित बाळनाथ विद्यालय चाकरवाडी ता. जि. बीड मार्च 2024 दहावीचा निकाल शंभर टक्के लागलेला आहे. बाळनाथ विद्यालय चाकरवाडी या शाळेतील 54 विद्यार्थी परीक्षेसाठी बसलेले होते. 54 पैकी 54 विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. शाळेने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थी विशेष प्राविण्यासह सात विद्यार्थी प्रथम श्रेणीत दोन विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. बाळनाथ विद्यालय चाकरवाडी या शाळेतून प्रथम क्रमांक शेळके संस्कार नेमिनाथ या विद्यार्थ्यांनी 97% घेऊन प्रथम क्रमांक उत्तीर्ण झाला आहे. आनवणे अंजली बाबुराव या विद्यार्थिनीने 92.80 % आणि माने धनश्री साहेबराव या सुद्धा विद्यार्थिनीने 92.80% या दोन विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक उत्तीर्ण झालेल्या आहेत. सावंत क्षितिजा कानिफनाथ या विद्यार्थिनीने 92.60% घेऊन तृतीय क्रमांक उत्तीर्ण झाली आहे. बाळनाथ विद्यालय या शाळेतील मुलींनीच यावर्षी पण बाजी मारली आहे. सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन श्री. उत्तरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती ज्योतीताई विनायकराव मेटे व सचिव श्री. आशुतोष भैय्या विनायकराव मेटे, प्रशासक प्राध्यापक श्री. फाटक पी. एफ. सर्व संचालक मुख्याध्यापक श्री. जगताप टी. आर. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ग्रामस्थ व सर्व पंचक्रोशीतील पालक यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# बीड झाले कर्चयाचे शहर सांगा कशी नांदेल स्वच्छता नगरपालिका दखल घेईल काय? शिवसंग्रामचे जिल्हा उपाध्यक्ष शेख अझहर यांचा सवाल

**बीड । प्रतिनिधी**



ठिकाणी घाणीचे सामाज्य साचले असून नाल्या तुंबल्या आहेत एक पावसाचा सटकारा आला किंवा नळाला पाणी जरी आले तर नालीचे पाणी रस्त्यावर येते तसेच ठिकठिकाणी कचरा आढळून येतोय त्यामुळे बीड नगरपालिका याची दखल घेईल की यासाठी तीव्र आंदोलन छेडावे लागेल असा सवाल पत्रकाद्वारे शिवसंग्रामचे जिल्हा उपाध्यक्ष शेख अझहर यांनी पत्रकाद्वारे केला आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, यावर्षीचा पावसाळा तोंडावर आला आहे. यंदा मान्सून लवकरच बरसणार असल्याचा हवामान खात्याने अंदाज वर्तविला आहे. हे लक्षात घेता मूल नगरपरिषद प्रशासन मान्सूनपूर्व तयारीला लागायला पाहिजे गटारलाईनची सफाई हा विषय तेवढाच महत्वाचा असून पावसाळ्यातील अडगळ थांबविणारा ठरणार असल्याचे बोलले जात आहे. शहरामध्ये स्टेडियमच्या मागील रस्त्यावर तसेच जुनीभाजीमंडई, नवी भाजीमंडई, कंकालेश्वरकडे जातांना पुलाच्या बाजूला, दाउदपुरा, मोमीनपुरा, मोहम्मदीया कॉलनी, बालेपीर येथे वेळेवर नगरपालिकेकडून कचरा नेण्यासाठी घंटागाडी येत नसल्याने कचरा साचल्याचे चित्र पहावयास मिळतेय. यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. उन्हाळ्याच्या शेवटी शहरामध्ये मान्सूनपूर्व कामे केली जातात. यातून नागरी वस्त्यांत स्वच्छतेबद्दल नियोजन केले जाते. तसेच बीड शहरातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे याबाबत स्वच्छता, नाल्यांची सफाई, सांडपाण्याचा निचरा आदींची काळजी घेतली जाते. यावर्षी पावसाळा सुरु होण्याला काही दिवस राहिलेले असतांनाही सफाईची कामे झालेली दिसत नाहीत. शहरात ठिकठिकाणी कचरापेटीच्या बाहेर पडून घनकचऱ्याचे ढिगारे साचलेले दिसून येत आहेत. त्यात मोकाट गुरे चारा शोधून कचरा विखुरतात. यामुळे परिसरात कचरा व घाण पसरलेली दिसते. याबाबत नागरिकांनी संबंधित नगरसेवक व नगर परिषदेच्या सफाई विभागात तक्रारी केल्या. परंतु, नगर परिषद प्रशासन त्याची दखल घेत नाही. या सर्व बाबींमुळे शहरात नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. शहरातील घनकचरा उचलण्याचे कंत्राट नगर परिषदेने दिलेले आहे. यातील कंत्राटदाराला महिन्याकाठी लाखो रुपयांच्या जवळ रक्कम दिली जाते. शासनाचे इतका खर्च होऊनही शहरात स्वच्छता राहत नसेल तर, कंत्राट देण्याचा उपयोग काय, असा प्रश्न आहे. परंतु, काम न करताच अर्धे अर्धे असा हिशेब सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे शहरांत मोठ्या प्रमाणात घाण पसरली आहे. आता पाऊस सुरू झाल्यावर आणखी बिकट परिस्थिती निर्माण होऊ शकते. नगर प्रशासनाने आजाराची साथ येण्याआधी स्वच्छतेचा मंत्र स्वीकारावा अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करुन झोपलेल्या नगर परिषद प्रशासनाला हिसका दाखवू असे शिवसंग्रामचे जिल्हा उपाध्यक्ष शेख अझहर यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# चौंडी या ठिकाणी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त मोठ्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित राहावे प्रा.संदीप गांडगे

**प्रतिनिधि/बीड**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती 31.मे रोजी संपूर्ण देशभरात मोठ्या प्रमाणात उत्साहात साजरी करण्यात शासनाच्या वतीने अनेक जयंतीच्या शासकीय सुट्ट्या दिल्या गेल्या आहेत, या सुट्टीच्या औचित्य साधून समाजातील अनेक घटकांनी जयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो महापुरुषांच्या त्यांनी केलेल्या त्यागाचा व त्यांच्या विचारांच्या आत्मसमान करतात



दिनांक 31 मे रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात शासकीय सुट्टी जाहीर करण्यात यावी देशभरातील सर्व शासकीय कार्यालयात गाव वाडी वस्तीवर राजमाता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करून त्यांच्या विचाराचा वसा सर्वसामान्य माणसापर्यंत गेला पाहिजे असे आव्हान व चौंडी या ठिकाणी अहिल्यादेवी होळकर जयंती सोहळ्यानिमित्त समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान प्राध्यापक संदीप गांडगे यांनी केले आहे.

,सौ. रुक्मिणी काळे तसेच मौजचे ,बळवंत डावकर. मोहन डावकर. मनोज डावकर. अंकुश डावकर. अंगद डावकर. रामदास डावकर. धनंजय डावकर. अमोल डावकर. वैभव रामचंद्र डावकर. हनुमंत डावकर यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# श्रुती शेजुळ या विद्यार्थिनी दहावी परिक्षेत ९१/.२० टक्के / घेऊन यशस्वी..



गेवराई / प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च 2024 मध्ये आयोजित इयत्ता दहावीच्या परीक्षेत गेवराई तालुक्यातील खांडवी येथील विद्यार्थिनी कु.श्रुती सुभाष शेजुळ या विद्यार्थिनी शारदा विद्या मंदिर गेवराई ता. गेवराई जि बीड येथे महाविद्यालयात शिक्षण घेत आहे या वर्षी दहावी परिक्षेत 91/20. टक्के घेऊन यश संपादन केले आहे मराठी विषयात 87 हिंदी 81 ईंग्लिश 82 मॅथ 93 विज्ञान 98 सामाजिक शास्त्र 93 या पैकी 500 पैकी453 गुण मिळवले आहे. या कठोर संघर्षातून अभ्यास करुन आपल्या आई वडीलांचे कष्टाची जाण ठेवून दहावी परिक्षेत यश संपादन केल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

बुधवार २९ मे २०२४



## कु. प्रतिक्षा जगन्नाथ घरत 10 वी परीक्षेत 100 टक्के गुण



बीड दि २७ (प्रतिनिधी) – राज्य माध्यमिक शालांत परीक्षेत महाजनवाडी गावची रहिवासी व शिवाजी विद्यालयाची विद्यार्थिनी कु. प्रतिक्षा जगन्नाथ घरत हिने १०० टक्के गुण घेत दहावी बोर्डाच्या परीक्षेत मोठे यश संपादन केले आहे. तिने मराठी ९४, संस्कृत १००, इंग्रजी ९४, गणित ९९, विज्ञान १००, समाज विज्ञान ९५ गुण मिळवले आहेत, एकूण ५०० गुणा पैकी तिला ४८८ + १२ एकूण १००% गुण मिळवलेले आहेत. तिचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे. व तिला पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देखील देण्यात आल्या आहेत.

# छगन भुजबळ त्यांच्या २ वक्तव्यांवरुन आले भाजप नेत्यांच्या निशाण्यावर

**मुंबई /प्रतिनिधि**

छगन भुजबळ हे त्यांच्या 2 वक्तव्यांवरुन भाजप नेत्यांच्या निशाण्यावर आले आहेत. 400 पारच्या नाऱ्यामुळं, महाराष्ट्रात निवडणुकीत वेगळा फरक पडला, असं भुजबळ म्हणाले आहेत. तसंच विधानसभेत 80-90 जागांचं आश्वसन दिल्याचं भुजबळ म्हणाले होते. त्यावरुन मुनगंटीवारांनी पुरावाच मागितला आहे. 400 पारच्या नाऱ्यामुळंच, संविधान बदलणार असा दलित समाजाच्या मनात भावना झाली आणि त्यामुळंच महाराष्ट्रातही लोकसभेच्या निवडणुकीत परिणाम दिसला.





असं रोखठोक विधान अजित पवारांचे मंत्री छगन भुजबळांनी केलं आहे. इकडे भाजपच्या निलेश राणेंनी, भुजबळांना आता आवरलं पाहिजे असा इशारा दिला आहे. निलेश राणे यांची टीका श्री छगन भुजबळांना आवरलं पाहिजे. आम्ही तुमच्या वयाचा आदर करतो पण उठ सूट कोण युती बिघडवायची भाषा बोलत असेल तर सहन होत नाही आणि होणार नाही. असं निलेश राणे यांनी म्हटले आहे. निलेश राणे यांच्या या टीकेनंतर अजित पवार गटाचे प्रवक्ते आनंद परांजपेही त्याच भाषेत बोलले. परांजपे म्हणाले की. निलेश आणि नितेश राणेंमुळं भाजपच अनेकदा अडचणीत आली. त्यांना महत्व देत नाही.लोकसभा निवडणुकीचा प्रचार सुरु होताच, भाजपनं 400 पारचा नारा दिला. आणि देशभरात इंडिया आघाडीच्या नेत्यांनी उद्धव ठाकरेंपासून ते राहुल गांधींपर्यंत संविधान बदलणार असल्याचा हल्लाबोल केला.

## लोकसभेचं गणित काय

लोकसभेला भाजपनं 28 जागा लढल्या आहेत. शिंदेंच्या शिवसेनेच्या वाट्याला 15 जागा आल्या. तर शिंदे गटाऐवढ्या जागा मागणाऱ्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीला 4 जागा मिळाल्या. जानकरांच्या रासपला 1 जागा मिळाली. विधानसभेचा विचार केला तर, सध्या भाजपचे स्वतःचे 105 आमदार आहेत आणि अपक्षांसह आकडा 114 आहे. शिंदेंच्या शिवसेनेकडे स्वतःचे 41 आमदार आहेत, आणि अपक्ष 10 आमदार आहेत. अजित पवार गटाकडे 40 आमदार आहेत. एकूण आमदारांची संख्या होते 205 आणि विधानसभेचं संख्याबळ आहे 288. म्हणजेच 83 जागा शिल्लक उतरतात. याच 83 जागांमध्ये तिघांमध्ये वाटप होईल.

## रुद्र सुरेशराव वडजे ९६ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण



नांदेड प्रतिनिधीनांदेड : रुद्र सुरेशराव पाटील वडजे याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत इयत्ता १० वी मध्ये ९६ टक्के गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे.त्याने १० वी मध्ये ५०० पैकी ४८० गुण मिळविले आहेत.मराठी विषयात १०० पैकी ८७ संस्कृत-९६ इंग्रजी- ८९ गणित ९९ विज्ञान-९७ गुण मिळाले आहेत. त्याबद्दल रुद्रचे सर्वत्र कौतुक होत आहे. रुद्रच्या यशाबद्दल शिवराज पाटील मसलगेकर, गंगाधर पाटील मसलगेकर, मधुकर पाटील जोमेगावकर,गणपतराव पाटील कदम प्रा.सुधाकरराव इंगोले ,भानुदास पाटील वडजे,किशनराव पाटील जाधव,बालाजी पाटील सिरसाट यांच्यासह शाळेतील शिक्षक आई-वडील नातेवाईक यांनी शुभेच्छा देऊन कौतुक केले.तसेच सर्व स्तरांमधून त्याचे अभिनंदन होत आहे.

## किसान विद्यालयातून कु.भाग्यश्री कदम प्रथम

**नांदेड प्रतिनिधी**

नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील किसान विद्यालयाचा दहावीचा निकाल ८५ टक्के इतका लागला असून येथे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता दहावी परीक्षेत कु.भाग्यश्री गणेश कदम हिने ८८.४० टक्के गुण घेऊन विद्यालयातून प्रथम क्रमांक ईश्वर राठोड याने ८७.४० टक्के घेऊन द्वितीय क्रमांक तर दिपक राठोड याने ८४.४०टक्के घेऊन



तृतीय क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले आहे. तर विद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळाल्याबद्दल कु.भाग्यश्रीचे सर्वत्र कौतुक होत आहे. भाग्यश्री कदम,ईश्वर राठोड, दिपक राठोड यांच्यासह उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री.स्वप्निल पाटील उमरेकर मुख्याध्यापक श्री.पदमवार पि.व्ही सिरसाट, एम.एम. बच्चेवार,जी.टी.सिरसाट, ए.डी. शिंदे, बी.डब्ल्यू कदम ,शिवाजी तुंबरफळे सरपंच साईनाथ पवार विद्यार्थ्यांचे पालक गणेश कदम, गजानन राठोड, दत्ता राठोड यांच्यासह विद्यालयातील शिक्षक आई-वडील नातेवाईक यांनी शुभेच्छा देऊन कौतुक केले.तसेच सर्व स्तरांमधून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# रात्रीच्या अंधाराचा गैरफायदा घेऊन काहीतरी दाखलपात्र गुन्हा करण्याच्या तयारीने दबा धरुन बसलेल्या दोघा संशयितांना रिक्षासह धारूर पोलिसांनी घेतले ताब्यात.

**(किल्ले धारूर प्रतिनिधी)**

पो. स्टे. धारूर हद्दीमध्ये ग्राम आवरगाव शिवारामध्ये रात्री 12.40 वाजेच्या सुमारास दोन इसम काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने काळ्या रंगाच्या रिक्षासह संशयितरित्या फिरत असल्याची माहिती डायल 112 यंत्रणेवरुन मिळाली होती. त्यावरून पो.स्टे. धारूर येथील रात्रगस्त करणारे पो.स्टाफ यांनी माहिती मिळालेल्या ठिकाणी पंचासमक्ष जाऊन खात्री केली असता आवरगाव शिवारात आवरगाव कडे जाणारा रोडच्या कडेला दोन इसम तोंडाला रुमाल बांधून अंधारात रिक्षा लावून लपून-छपून त्यांचे अस्तित्व लपवून तेथे आढळून आल्याने सदर ठिकाणी छापा टाकण्यासाठी गेलो असता सदरील दोन्ही ईसमापैकी एक ईसम अंधारात पळून जावू जाऊ लागला व दुसरा रीक्षा घेऊन पळून जायला लागला त्या दोघांना स्थानिक दक्ष नागरिकांच्या मदतीने पाठलाग करून पकडले असता त्यांनी त्यांची नावे 1. दीपक सर्जेराव कांबळे वय 25 राहणार तेलगव रोड, सिंगणवाडी ता. धारूर जिल्हा बीड, 2. वैभव नवनाथ



कांबळे वय 20 रा. तेलगाव रोड, सिंगणवाडी तालुका धारूर जिल्हा बीड अशी सांगितली सदर दोन्ही इसम हे सूर्यास्त ते सूर्योदय दरम्यान रात्रीच्या अंधाराचा गैरफायदा घेऊन काहीतरी दाखलपात्र गुन्हा करण्याच्या तयारीने त्यांचे अस्तित्व लपवून संशयास्पद रित्या फिरत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांचे विरूद्ध कलम 122 (ब) महाराष्ट्र पोलीस कायद्याप्रमाणे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्याकडील रिक्षा जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई सपोनि श्री. डी.बी. वाघमोडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उप निरीक्षक श्री सर्जे, सहा. पोलीस उप निरीक्षक श्री. खालील मोमीन, पो. अंमलदार नितीन काळे, धम्मानंद गायसमुद्रे यांनी केली असून पुढील तपास पोहेकॉ पुरी हे करत आहेत.

## यशवंत विद्यालय वानगाव या शाळेचा उज्वल यशाची परंपरा कायम..


**(बीड प्रतिनिधी)**

बीड प्रतिनिधी - बीड तालुक्यातील वानगाव येथील यशवंत विद्यालय वानगाव ता. जि. बीड मार्च 2024 दहावीचा निकाल शंभर टक्के लागलेला आहे. यशवंत विद्यालय वानगाव या शाळेतील 100% निकाल लागलेला आहे. शाळेने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. यशवंत विद्यालय वानगाव या शाळेतून प्रथम क्रमांक जोगदंड प्रकाश चंद्रकांत 89.20% घेऊन प्रथम क्रमांक उत्तीर्ण झाला आहे. चव्हाण खंडोबा वासुदेव 88.60% या विद्यार्थी द्वितीय क्रमांक उत्तीर्ण झालेला आहेत. जोगदंड शिवानी सुधाकर या विद्यार्थिनीने 88.20% घेऊन तृतीय क्रमांक उत्तीर्ण झाली आहे. यशवंत विद्यालय या शाळेतील मुलांनी यावर्षी बाजी मारली आहे. सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन श्री. उत्तरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती ज्योतीताई विनायकराव मेटे व सचिव श्री. आशुतोष भैय्या विनायकराव मेटे, प्रशासक प्राध्यापक श्री. फाटक पी. एफ. सर्व संचालक मुख्याध्यापक श्री. जगताप सर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ग्रामस्थ व सर्व पंचक्रोशीतील पालक यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## कु.अन्वी टाक दहावीच्या परीक्षेत १०० टक्के गुणांची मानकरी

**माजलगाव प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत अन्वी अशोक टाक हिने १०० पैकी १०० टक्के प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले. कु. अन्वी अशोक टाक सिद्धेश्वर विद्यालयाची विद्यार्थिनी आहे. अन्वी



टाक हिने राज्यस्तरीय संगीत स्पधेत विशेष प्राविण्य मिळाले त्यामुळे तिला विशेष गुणांचा लाभ मिळाला.अतिरिक्त विशेष १५ गुण मिळाले असून तिने दहावीच्या परीक्षेत १०० पैकी १०० टक्के घेऊन यश संपादन केले. अन्वी चे वडील पाटबंधारे विभागात तर आई प्रा. वैशाली अशोक टाक (शहाणे) सुंदरराव सोळंके महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. अन्वी टाक हिच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com